**नि.फौ.ख.क्र. ३९२/२०१२**
शासन वि. अमोल लवटे.
नि.क्र.८६

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १</u>**

मी शपथेवर खरे कथन करतो की,

**नाव : रघुनाथ बाळकृष्ण काळे,**
आधार क्र. ९६७७ २८२७ ७००९
वय : ६५ वर्षे, व्यवसाय: शेती,
रा. नांदगाव, ता.कराड, जि. सातारा.

**<u>सरतपासणी – सरकारी वकील श्रीमती एस.के.अहिवळे यांचे मार्फत–</u>**

१. मला सदर घटनेबद्दल काही माहिती नाही. खबर देणार ही माझ्या वडिलांच्या चुलत भावाची मुलगी आहे. आरोपी क्र. १ हा माझा चुलत मेव्हणा असुन आरोपी क्र. २ ही त्याची आई आहे. आरोपी क्र. ३ कोण आहे हे मला माहिती नाही.

**<u>सरकारी वकिलांतर्फे सरतपास पुर्ण</u>.**

**<u>सरकारी वकीलांना भारतीय पुरावा कायदा कलम १५४ च्या अन्वये उलटतपासाची परवानगी देण्यात येत आहे.</u>**

**<u>उलटतपास सरकारी वकीलांतर्फे –</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, खबर देणार भाग्यश्री अमोल लवटे हिचा विवाह आरोपी क्र. १ याच्याशी झालेनंतर आरोपी क्र. २ हिने खबर देणार हिचेकडे गायी खरेदी करणेसाठी माहेराहुन ५०,०००/– रुपये घेवुन येण्यास सांगितले व त्या कारणावरुन तिला मारहाण करुन मानसिक व शारिरीक त्रास देण्यास सुरुवात केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ याने खबर देणार हिस त्रास देणे चालूच ठेवले व शेरे येथील लता नावाच्या महिलेशी दुसरे लग्न केले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर दि. १२/०९/२०१२ रोजी आरोपी क्र. १ ते ३ यांनी खबर देणार हिला उपाशी ठेवुन, मारहाण करुन क्रुर वागणुक देवुन माहेराहुन र.रु.५०,०००/– घेवुन ये असे म्हणुन रात्री ८.०० वाजणेच्या सुमारास मुलगी स्वरुपासह घरातुन हाकलुन दिले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचे असल्याने मी त्यांना वाचवण्याकरिता मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास सरकारी वकिलांतर्फे पुर्ण</u>.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस.बी.शिंदे यांचेमार्फत</u>**

३.            हे म्हणणे खरे आहे की, पुर्वीपासुन माझा व आरोपींचा काही संबंध नसलेमुळे मी त्यांना ओळखत नाही.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2026.07.24 17:10:04 +0530

दि. २४/०७/२०२६.

(ए.ए. उत्पात)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कराड.
(कोर्ट क्र.०४)